**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा

- भुसावळ-वर्धा, गोंदिया-डोंगरगड यासह देशातल्या एकंदर ८९४ किलोमीटर रेल्वे मार्गावर अतिरीक्त मार्गिका टाकायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी मुंबई विमानतळ, मेट्रो ३ चा अखेरचा टप्पा, आणि मुंबई १ ॲपचं लोकार्पण, ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मरही उद्यापासून मुंबई दौऱ्यावर

- संयुक्त खाते धारकांनाही आता मिळणार युपीआय सुविधा

**आणि**

- जॉन क्लार्क, मिशेल देवोरे आणि जॉन मार्टिनिस यांना यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर

**<><><><>**

राज्यात पुरामुळं झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून राज्य सरकारनं ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज शेतकऱ्यांसाठी जाहीर केलं आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याला मंजुरी मिळाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड कॅप्सूल**

*(राज्यातल्या एकंदर ६८ लाख ६९ हजार ७५३ हेक्टरवरच्या पिकाचं या पावसामुळं नुकसान झालं असून २९ जिल्ह्यांमधल्या २५३ तालुक्यांतल्या २ हजार ५९ मंडळांतल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार नुकसान भरपाई देणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्रालयात वार्ताहर परिषदेत जाहीर केलं. यापैकी जास्तीत जास्त नुकसान भरपाई दिवाळीच्या आधी देण्याचा प्रयत्न करू, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.*

- ***- होल्ड… बाईट- देवेंद्र फडनवीस - -***

*विहिरी, पायाभूत सुविधा पुन्हा उभारण्यासाठी, तसंच घरं, दुकानं, गोठे, जनावरांचं नुकसान झालेल्यांनाही अर्थसहाय्य देणार असल्याचं फडनवीस यांनी सांगितलं. तसंच, खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख नुकसान भरपाई, तर ३ लाख रुपये प्रति हेक्टर इतकी भरपाई मनरेगाच्या माध्यमातून देऊ, अशी माहितीही त्यांनी दिली. दुष्काळाच्या तरतुदी इथंही लागू करून त्यानुसार कार्यवाही करू, असा पुनरुच्चार फडनवीस यांनी केला.)*

**<><><><>**

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा नोंदी असलेल्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासन निर्णयाला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर राज्याच्या सामाजिक न्याय विभागानं उत्तर द्यावं, असे आदेश मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं दिले. गेल्या २ सप्टेंबर रोजी हा शासन निर्णय जारी झाला होता.

**<><><><>**

भुसावळ-वर्धा, गोंदिया-डोंगरगड यासह एकंदर ८९४ किलोमीटरच्या रेल्वे मार्गिकांच्या विकासाला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यासाठी एकंदर २४ हजार ६३४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

भुसावळ आणि वर्धा दरम्यानच्या ३१४ किलोमीटरच्या रेल्वे मार्गावरच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेला, तसंच गोंदिया - डोंगरागड या ८४ किलोमीटरच्या रेल्वे मार्गावरच्या चौथ्या मार्गिकेला यात मंजुरी मिळाली.

- **होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट - -**

इटारसी - भोपाळ - बिना दरम्यान चौथी मार्गिका, तसंच वडोदरा - रतलाम दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेलाही केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवस मुंबई दौऱ्यावर येत आहेत. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- **होल्ड व्हाइस कास्ट-**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन होईल. डिसेंबरपासून या विमानतळावरुन उड्डाणांना सुरुवात होईल. मुंबई मेट्रो-३ चा आचार्य अत्रे मार्ग ते कफ परेड दरम्यानचा अखेरचा टप्प्यातल्या मेट्रो सेवेलाही प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. यामुळं आरे कॉलनी, बीकेसी, सीएसएमटी, चर्चगेट, मंत्रालय, विधानभवन मेट्रो मार्गिकेनं जोडले जाणार आहेत.*

*लोकल, मुंबई महानगर परिसरातल्या सर्व मेट्रो, मोनो, बेस्ट तसंच मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व महापालिका क्षेत्रातल्या बस सेवेचं तिकिट एकाच ॲप वरुन काढता येणाऱ्या मुंबई वन ॲपचं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. विविध मेट्रो, बस, लोकल वगैरेंनी टप्प्याटप्प्याने नागरिकांना प्रवास करायचा असला तरी या सर्व प्रवासासाठी स्वतंत्र तिकिटाऐवजी एकच तिकीट या ॲपद्वारे काढता येईल. आयटीआय आणि तंत्रनिकेतन मधल्या लघु कालीन अभ्यासक्रमांनाही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात होईल.)*

**<><><>**

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर उद्यापासून २ दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. ९ ऑक्टोबर रोजी ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मुंबईत भेट घेतील आणि भारत-ब्रिटन द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेतील. यावेळी दोन्ही नेते विविध उद्योगांच्या प्रमुखांशीही चर्चा करणार आहेत. तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही त्यांच्यात चर्चा होईल.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी संवाद साधला आणि त्यांना ७३व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. २३व्या भारत-रशिया वार्षिक परिषदेसाठी पुतीन भारतात येणार असून त्यांचं स्वागत करायला उत्सुक असल्याचंही मोदी यांनी यावेळी सांगितलं.

**<><><>**

लाभार्थ्यांना थेट मदत हस्तांतरित केल्यानं गेल्या ११ वर्षात केंद्र सरकारची ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांची बचत झाली आणि लाभार्थ्यांची संख्या १६ पटींनी वाढली, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. मुंबईत सुरू झालेल्या ग्लोबल फिनटेक फेस्टच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. गिफ्टसिटीमधले परकीय चलनाचे

व्यवहार तत्काळ पूर्ण व्हावे यासाठीच्या नव्या यंत्रणेचं अनावरण त्यांनी केलं. यापूर्वी या व्यवहारांना ३६ ते ५४ तास लागत होते.

**<><><>**

ग्राहकांना सुरक्षितरित्या पैसे हस्तांतरित करता यावे यासाठी सेबी आणि एनपीसीआय यांनी वैध यूपीआय आणि सेबी चेक सुविधा सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली. या अंतर्गत म्युच्युअल फंडांच्या युपीआयमध्ये .MF तर शेअर दलालांच्या युपीआयमध्ये .BRK असणार आहे.

**<><><>**

बँकेत संयुक्त खातं असणाऱ्यांनाही आता युपीआयचा लाभ घेता येईल. रिझर्व्ह बँकेचे डेप्यूटी गव्हर्नर टी. रविशंकर यांनी आज ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये या सुविधेचा प्रारंभ केला. कुठल्याही युपीआय ॲपद्वारे या सुविधेचा लाभ घेता येईल. स्मार्ट ग्लास अर्थात अत्याधुनिक चष्म्यांच्या माध्यमातून आता छोट्या रकमेचे व्यवहार युपीआय द्वारे करता येतील. याची सुरुवातही त्यांनी आज केली.

**<><><>**

माध्यम आणि मनोरंजन उद्योगात गेल्या २५ वर्षांत झालेली प्रगती उल्लेखनीय असून २५ हजार कोटी रुपयांवरुन हा उद्योग अडीच लाख कोटी रुपयांवर गेला असल्याची माहिती, केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी दिली. मुंबईत रौप्यमहोत्सवी फिक्की फ्रेम्सचं उद्घाटन करताना ते बोलत होते. जगभरातल्या सिनेरसिकांना भुरळ घालणाऱ्या भारतीय चित्रपटांचा उल्लेख त्यांनी केला.

फिक्की फ्रेम्स आणि मराठी चित्रपटातला संबंध वाढवू असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या परिषदेत दिलं. वेव्ह्ज ओटीटी हा मंच सर्व प्रकारच्या भारतीय कंटेंटसाठी सर्व समावेशक व्यासपीठ आहे, अशी माहिती प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी दिली.

**<><><>**

उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी आज संसद भवनात राज्यसभेतल्या विविध राजकीय पक्षांच्या गटनेत्यांची बैठक घेतली. सभागृहाचं कामकाज

सुरळीत चालावं यादृष्टीनं कमीत कमी व्यत्यय आणि जास्तीत जास्त चर्चा कशी होईल, याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

**<><><><>**

२०२५ साठीचा भौतिकशास्त्र क्षेत्रातला नोबेल पुरस्कार जॉन क्लार्क, मिशेल देवोरे आणि जॉन मार्टिनिस यांना आज जाहीर झाला. एका चिपच्या मदतीनं क्वांटम भौतिकशास्त्र विषयात त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनासाठी त्यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. त्यांच्या कामामुळे क्वांटम कम्प्यूटर्स, क्वांटम सेन्सर्स आणि क्वांटम क्रिप्टोग्राफी या क्षेत्रांना नवे आयाम मिळाल्याचं द रॉयल स्विडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसनं म्हटलं आहे.

**<><><><>**

एकाच आवारात असलेल्या असलेल्या मुला-मुलींच्या शाळांचे एकत्रीकरण करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. याशिवाय इच्छुक असलेल्या कन्या शाळांना सहशिक्षणाच्या अर्थात मुला-मुलींच्या एकत्र शाळेत रुपांतरित करायला राज्य सरकार मान्यता देणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार यासंदर्भातला शासन आदेश आज जारी झाला.

**//<><><><>//**